**नि.दि. दा.क्र. ४२३/२०१९**
**संजय वि. सत्यवान**
**नि.क्र. ३४**

वादी करीता सा.क्र.०१

**<u>प्रतिवादी क्रं.१ व २ करिता पुढील उलट तपास विधीज्ञ श्री.टी.बी.शिंदे यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>**

१४. दावा मिळकतीची मी शासकीय मोजणी केलेली नाही.

**प्रश्न-** दावा मिळकतीचे कोणाच्या नावे किती क्षेत्र आहे?

**उत्तर-** मी,माझे भाऊ व वडील यांच्या नावे दावा मिळकत आहे.

**प्रश्न-** दावा मिळकतीपैकी किती क्षेत्र तुमच्या ताब्यात आहे ?

**उत्तर-** सुरुवातीपासून जेवढे क्षेत्र ताब्यात आहे तेवढेच आमच्या ताब्यात आहे.

दावा दाखल करण्यास मला दि.३१.१२.२०१८ रोजी कारण घडले. मला प्रतिवादी यांनी मारहाण केल्याबाबत मी पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. त्या तक्रारीबाबतचा काही कागद मी दाव्यात दाखल केला आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. मारहाणीच्या घटनेबाबत पोलीसांनी काही कार्यवाही केली किंवा कसे हे मला आठवत नाही.

१५. शासकीय रुग्णालयात मी उपचार घेतल्याचे कागद मी दाखल केले किंवा कसे हे मला आठवत नाही. तसे कागदपत्र मी दाव्यात दाखल केलेले नाहीत. मी शासकीय रुग्णालयात उपचार घेतल्याबाबतचे कागदपत्र दाखल केलेले नसतानाही ते दाखल केले असे सरतपासात का सांगतो याचे कारण मी सांगू शकत नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत जनावरे सोडली याबाबत मी पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलीस ठाण्याची त्याबाबतची कागदपत्र मी दाखल केली किंवा कसे हे मला आठवत नाही. पोलीस ठाण्याची त्याबाबतची कागदपत्र मी दाखल केलेली नाहीत. मी प्रतिवादी सत्यवान, त्यांच्या पत्नी व त्यांच्या भावकीतील इतर लोक व प्रतिवादी सत्यवान यांची मुले यांच्या विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार केली होती.

१६. माझ्याकडे जनावरे होती हे दाखवणारा पुरावा मी दाखल केलेला नाही. माझा दुग्ध व्यवसाय होता हे दाखवणारा पुरावा मी दाखल केलेला नाही. प्रतिवादी सत्यवान यांनी बांध फोडल्याबाबत मी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो होतो.पोलीसांनी त्यावेळी माझी तक्रार घेतली नाही. मी त्यावेळी वरिष्ठ पोलीस अधिका-याकडे गेलो नाही. प्रतिवादींनी सन २०१९ ला बांध नष्ठ केला. त्याची तारीख व महिना मला आठवत नाही, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात जून महिना व पोळा सण असलेला महिना या दरम्यान प्रतिवादींनी बांध फोडला. त्यापुर्वी प्रतिवादी बांध फोडण्याचा प्रयत्न करत होते. पुर्वी त्यांनी बांध फोडलेला नव्हता. दावा मिळकतीच्या उत्तरेस शिव आहे व त्या शिवला लागून माझी जमिन आहे.

१७. प्रतिवादी यांनी माझ्या ताब्यात असलेल्या क्षेत्रास मला केव्हाही हरकत अडथळा केला नाही हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीचा मी मालक नाही हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकत प्रत्यक्ष रित्या माझ्या कब्ज्यात नाही हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी यांच्या क्षेत्रात असलेली कुपनलिका मी माझ्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला हे म्हणणे खरे नाही. मी सांगतो तसे गवत प्रतिवादी यांच्या क्षेत्रात आहे हे म्हणणे खरे नाही. माझे व प्रतिवादीच्या भावकीतील लोकांमध्ये पाणंद रस्त्याबाबत वाद होते हे म्हणणे खरे आहे. त्या लोकांनी आमच्या विरुध्द दावा दाखल केला होता हे म्हणणे खरे नाही. सत्यवान हे त्यांच्या भावकीतील लोकांना त्या दाव्यात मदत करतात म्हणून मी त्यांच्या विरुध्द प्रस्तुत दावा दाखल केला हे म्हणणे खरे नाही. दि.०२.१०.२०१९ रोजी दावा दाखल केल्याचा राग मनात धरुन मी व माझा भाऊ यांनी प्रतिवादी यांना घरात घुसून मारहाण केली हे म्हणणे खरे नाही. त्या मारहाणीत प्रतिवादी सत्यवान यांचा हात मोडला होता हे म्हणणे खरे नाही. मी खोटा सरतपास दाखल केला हे

**नि.दि. दा.क्र. ४२३/२०१९**
**संजय वि. सत्यवान**
**नि.क्र. ३४**

म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.10.04 10:48:00 +0530

(रवि वि.पांडे)
दिनांक ०१/१०/२०२५.
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर